# ग्रामीण भागातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजना राबवितांना येणा-या अडचणींचा शोध घेवून उपाययोजना करणे.

संशोधकाचे नाव
श्री. नंदकिशोर रंगनाथ घोडेकर
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
प्राचार्य मा. डॉ. दादासाहेब मोरे
*(एम.एस्सी.एम.एड.पी.एच.डी)*
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*

*सारांश :–*

*मानवी जीवन हे गतीमान आहे. मानवी जीवन हे विकसित होणारे आहे आणि हा विकास शिक्षणातून होतो असे मानले जाते. शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा आहे.शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. मानवाच्या सर्वांगाला शिक्षण हे व्यापून टाकणारे आहे . त्यामुळे जीवनातील विविध अंगांचा अंतर्भाव शिक्षण या संकल्पनेत झालेला दिसतो. शिक्षण म्हणजे संस्कृती, मूल्यसंस्कार, ज्ञान कौशल्य, आत्मसात करणे. या सर्व गोष्टींचा भावी पिढीला वारसा देण्याचे साधन म्हणजे शिक्षण होय. औपचारिक शिक्षणाबरोबरच प्रौढ शिक्षण, दुरस्थ शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, मुक्त विद्यापीठाद्वारे मिळणारे शिक्षण या सर्वांद्वारे घरोघरी शिक्षण पोहोचविण्याचे कार्य सुरू आहे. कारण ज्ञानाच्या प्रस्फोटाबरोबरच नव्या समस्या, नवनवीन आव्हाने, वेगाने बदलणारे तंत्रज्ञान, त्यामुळे बदलणारी सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती, बदलते जागतिक समीकरणे, मुक्त अर्थव्यवस्था अशा सर्व समस्या सोडविण्याची शक्ती केवळ शिक्षणामध्येच आहे. शिक्षणाने प्रत्येक व्यक्तीचे जीवन व्यापले आहे.*

*शिक्षणाचे दोन अर्थ आहेत. एक संकुचित व दुसरा व्यापक. कारण सॉक्रेटिसच्या काळापासून ज्ञान हा सद्‌गुण मानला जातो.* **"Knowledge is virtue"** *असे सॉक्रेटिसने म्हटले आहे. तर जॉन ॲडम्स यांच्या मते माणसाच्या ठिकाणी वास करण्यात करणा-या उपजतक्षमतांचा विकास होय.*

*शिक्षणाला इंग्रजी भाषेत* **Education** *असा शब्द वापरला जातो. याचा अर्थ अविष्कार करणे. म्हणजे व्यक्तीच्या ठिकाणी असलेले सुप्त गुण संवर्धित करणे. तसेच या गुणांना चालना देऊन त्यांचा अविष्कार करणे हे शिक्षणातून साध्य होते. मात्र ही शिक्षणाची प्रक्रिया राबवताना शासन अनेक योजनांची कार्यवाही करते. या योजना राबविताना येणा-याअडचणींचा अभ्यास संशोधक आपल्या संशोधनात करणार आहे. शालेय पोषण आहार योजना अंमलबजावणीतील अडचणींचा शोध संशोधक घेणार आहे.*

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**महत्त्वाचे शब्दः–** शिक्षण, प्राथमिक शिक्षण, शालेय पोषण आहार योजना

**शिक्षणाची व्यापक संकल्पनाः–** प्रसिद्ध अमेरिकन शिक्षण शास्त्रज्ञ जॉन डयुई यांनी शिक्षणाची व्यापकता स्पष्ट करताना म्हटले आहे, शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाची तयारी नव्हे तर ती विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष अनुभव जन्य जीवन होय. शिक्षणाविषयी अनेक शिक्षण तज्ञांनी व्याख्या केल्या आहेत.

**रुसो** :–"शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या ठाई असणा-या अंतर्गत शक्तीचा विकास."

**मादाम मॉन्टेसरीः**–"मुलांचा स्वाभाविक विकास घडवून आणणे म्हणजे शिक्षण होय."

**स्वामी विवेकानंदः**–"Education is the manifestation of perfection which is already within the man" म्हणजेच "मनुष्याच्या ठाई वसत असलेल्या पूर्णत्वाचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण होय."

प्रत्येक व्यक्ती ही आपल्या जीवनात येणा-या अनुभवानुसार रोज नवनवीन गोष्टी आत्मसात करत असते आणि त्यातून त्याचे शिक्षण घडते. शिक्षण ही अखंड चालणारे प्रक्रिया असून ती व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत चालू असते. गेट्स या शिक्षण शास्त्रज्ञाने म्हटले आहे.

"Education means progressive change in human behaviour."याचाच अर्थ शिक्षण म्हणजे विकासशील बदल होय. हे बदल व्यक्तीमध्ये सर्व अंगांनी होतात. म्हणजेच व्यक्ती विविध कौशल्य प्राप्त करते. त्यातून भावनांचा परिपोष होतो. अभिरुची निर्माण होते. त्याचा बौद्धिक, वैचारिक विकास होऊन व्यक्ती ज्ञानसंपन्न बनते. व्यक्तीच्या वर्तनात होणारा हा बदल योग्य दिशेने होत असेल तरच त्याला शिक्षण असे म्हणता येईल. यावरून शिक्षण हे व्यक्तीला संपन्न आणि समृद्ध करणारे सर्वश्रेष्ठ साधन आहे. तसेच ते मनुष्याच्या परिवर्तनाचे साधन आहे. कारण व्यक्तीचा बाल्यावस्थेपासून, वृद्धावस्थेपर्यंत विकास शिक्षणाच्या माध्यमातून होत असतो.

**प्राथमिक शिक्षणाची संकल्पनाः–**

माणसाच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण असे महात्मा गांधींनी म्हटले आहे. याचाच अर्थ माणसाच्या अंगी उपजत काही क्षमता आणि काही शक्ती असतात आणि त्या शिक्षणामुळे उत्कृष्ट बनतात. व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे जसजसा काळ बदलतो तस तशा गरजा ही बदलतात. म्हणूनच काळानुसार बदलण्यासाठी शिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे. त्यासाठी शिक्षणाची सुरुवात चांगल्या प्रकारे होणे आवश्यक असते. अशा उत्कृष्ट शिक्षणाची सुरुवात प्राथमिक शिक्षणापासून होते.

लोकशाही राज्यपद्धती असलेल्या विकसनशील भारत देशात एक आदर्श आणि सुसंस्कृत नागरिक तयार करण्याच्या दृष्टीने शिक्षण ही महत्त्वाची बाब आहे. त्यात प्राथमिक शिक्षणाचा सहभाग महत्त्वाचा आहे. लोकशाही शिक्षणाचा व शिक्षण व्यवस्थेचा मूलभूत पाया प्राथमिक शिक्षणातून घातला जातो.

भावी जीवन विकासाचे बीजारोपण करण्यासाठी समाज शिक्षणाचा पाया घालण्यासाठी दिले जाणारे शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षण होय.

महात्मा फुलेंनी हंटर कमिशन समोर प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व मांडले होते. प्राथमिक शिक्षणाचा

अधिनियम 1 एप्रिल 1949 पासून अमलात आला. प्राथमिक शिक्षणाची आर्थिक तरतूद जिल्हा शिक्षण मंडळे व अधिकृत नगरपालिका, शिक्षण मंडळाकडे सोपवण्यात आली. लोकशाही विकेंद्रीकरण तत्व महाराष्ट्र शासनाने मान्य केल्यानंतर 1 मे 1962 ला जिल्हा परिषदांची स्थापना केली व जिल्हा पातळीवर अनेक योजनांची कार्यवाही करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदांकडे सोपविली. त्यातील एक महत्त्वाची योजना म्हणजे प्राथमिक शिक्षण.

प्राथमिक शिक्षणाचा सर्व कारभार जिल्हा परिषद व पंचायत समितीकडे सोपवला तेव्हापासून प्राथमिक शिक्षणाला योग्य गती प्राप्त झाली. प्राथमिक शिक्षणासाठी लागणारा खर्च हा अंशतः कर रूपाने व शासनाकडून मिळणामिळणा-या 90 टक्के अनुदानातून करण्यात येतो. तसेच प्राथमिक शिक्षणाचे नियंत्रण आणि पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी ही शासनाची आहे. त्यात अभ्यासक्रम तयार करणे, पाठ्यपुस्तकांना मान्यता देणे आणि सक्तीच्या शिक्षणाची अंमलबजावणी करणे. इत्यादींचा समावेश होता. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण घेता येण्यासाठी प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यात आले.त्या सार्वत्रिकीकरणात येणा-या समस्या दूर करण्यासाठी शासनाने शालेय पोषण आहार योजना सुरू केली.

**शालेय पोषण आहार योजनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

कोणत्याही देशाच्या प्रगतीमध्ये शिक्षणाचे स्थान सर्वात महत्त्वाचे आहे. विविध प्रकारचे विकास कार्यक्रम तयार करून शासन आवश्यक असे प्रशिक्षित मनुष्यबळ वाढविण्याचा प्रयत्न करते. देशाच्या विकासात शिक्षणाची भूमिका लक्षात घेऊन शिक्षण विषयक अनेक कार्यक्रम राबविले जातात. प्राथमिक शिक्षण हा त्याचा पहिला टप्पा आहे. हा पाया पक्का होण्यासाठी आणि उच्च शिक्षण होईपर्यंत विद्यार्थी टिकून राहण्यासाठी व शिक्षणातील गळती वाढू नये यासाठी शासनाच्या विविध योजना कार्यालयात असतात.

त्यापैकी शालेय पोषण आहार योजना आहे.

प्राथमिक शिक्षण प्रत्येकाला मिळावे,कुपोषणाची समस्या दूर व्हावी व सार्वत्रिकीकरणाचा कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून सरकारने 1995–96 पासून ही योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत सन 1995–2002 पर्यंत कोरडा तांदूळ प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या 80 टक्के उपस्थितीच्या प्रमाणात दिला जात असे. परंतु त्यात काही समस्या निर्माण झाल्यामुळे सन2002 पासून आदिवासी भागात तर जानेवारी 2003 पासून राज्यातील अनुज्ञेय शाळांमध्ये तांदूळ शिजवून देण्याची योजना राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यात शालेय पोषण आहार योजना दि. 22/11/1995 पासून इयत्ता पहिली ते पाचवीसाठी टप्प्याटप्प्याने सुरू झाली. तसेच पुढे 2008 पासून इयत्ता सहावी ते आठवीसाठी शालेय पोषण आहार योजना लागू करण्यात आली. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांची 80 टक्के उपस्थिती लक्षात घेऊन तीन किलो तांदळाची पिशवी शैक्षणिक वर्षात दहा महिन्यांसाठी वाटप करण्यात येत असत. 2001–2002 पर्यंत तांदूळ वाटपाची योजना चांगल्या प्रकारे चालवली गेली.

**शालेय पोषण आहार योजनेची सद्यस्थिती –**

पोषण आहार योजनेत दि.18/06/2009 च्या शासन निर्णयानुसार काही सुधारणा केल्या. त्या पुढीलप्रमाणे– दिनांक 1 जुलै 2010 पासून लागू झाल्या.

1) ग्रामीण भागात तांदूळ व इतर धान्यादी मालाचा पुरवठा थेट शाळांना होणार आहे.

उदा.कडधान्य, तेल, मीठ, मिरची, हळद, मोहरी इत्यादी.

2) शहरी भागात तांदुळाची वाहतूक करून शाळांना किंवा शाळांनी केंद्रीय स्वयंपाकगृहाचा अवलंब केला असल्यास तेथपर्यंत तांदुळाचा पुरवठा केला जाणार आहे.

3) शिक्षण संचालक प्राथमिक व महाराष्ट्र स्टेट को–ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड मुंबई यांच्यातील दिनांक 23 ऑक्टोबर 2009 ला झालेल्या करारानुसार तांदूळ उपलब्ध होतो.

4) प्राथमिक 1 ते 5 विद्यार्थ्यांसाठी 450 उष्मांक व 12 ग्रॅम प्रथिने तर उच्च प्राथमिक 6 ते 8विद्यार्थ्यांसाठी 700 उष्मांक व 20 ग्रॅम प्रथिने याप्रमाणे आहेत.

5) 15 नोव्हेंबर 2022 रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रतिदिन प्रति लाभार्थी आहार खर्च मर्यादा इयत्ता 1 ली ते 5 वी साठी रुपये 5.45 आणि इयत्ता 6 ते 8 वीसाठी 8.17 रु. होती.

6) दिनांक 27 नोव्हेंबर 2024 रोजीच्या शासन आदेशान्वये प्राथमिक इयत्ता 1 ते 5 साठी प्रतिदिन प्रति लाभार्थी रुपये 6.19 इतके व उच्च प्राथमिक इयत्ता 6 वी ते 8 वीसाठी प्रतिदिन प्रति लाभार्थी 9.29 रुपये इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

7) सदरची दरवाढ दिनांक 1 मार्च 2025 पासून लागू करण्यात आली आहे.

सध्या ही योजना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना या नावाने सुरू आहे.

संदर्भसूची–

1. खडसे इंदिरा (2008) पोषण व आहारशास्त्र पुणे, हिमालय प्रकाशन
2. गावडे प्र.ल.(1998) विचार प्राथमिक शिक्षणाचा, पुणे, उत्कर्ष प्रकाशन
3. गद्रे गीता,गद्रे ल. रा.(1977) शिक्षणाचा इतिहास, पुणे, नूतन प्रकाशन
4. पानसे के.व्ही.(1975) समाजाच्या आहारविषयक गरजा, पुणे, कॉन्सिनेंन्टल प्रकाशन.
5. प्रा. भाळवणकर भा.गो.(2006) प्राथमिक शिक्षण सद्यस्थिती समस्या व उपाय, पुणे,सुविचार प्रकाशन
6. वाघमारे शोभा (2008) पोषण आणि आहार औरंगाबाद, विद्या प्रकाशन